


संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..

बांधिलकी जनहिताची

# नायक

सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने | कार्यकारी संपादक : श्याम तिवारी




Sangamner | MAHMAR/2018/75654 | वर्ष ८ | अंक ३८ | ११/६/२०२५ (दैनिक) | किंमत रु.२/- | पाने ४







# ‘सर्वोच्च’ निर्देशानंतरही संगमनेरसह ९२ पालिकांचे भवितव्य आधांतरितच!

## घोषित प्रक्रियेला मिळाली होती स्थगिती

## तांत्रिक कारणाने निवडणूका खोळंबण्याची शक्यता

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

ओबीसी आरक्षणासह, सत्तांतरानंतर प्रभागरचना आणि थेट जनतेतून नगराध्यक्ष निवडीच्या निर्णयांना सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेल्याने राज्यातील बुहतेक सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका खोळंबल्या आहेत. त्यामुळे गेल्या प्रदीर्घ काळापासून संपूर्ण राज्याचा गाडा अधिकाऱ्यांच्या खांद्यावर असून बहुतेक सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासक आहेत. गेल्या महिन्यात सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील खोळंबलेल्या निवडणुकांबाबत गंभीर भाष्य करताना चार महिन्यात निवडणूक प्रक्रिया राबवण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिले होते. ओबीसी आरक्षणाची यशास्थिती गृहीत धरण्याची मुभा देत निवडणुका घेण्याबाबत कोणतीही स्थगिती नसल्याकडेही न्यायालयाने राज्याच्या महाधिवक्त्यांचे लक्ष वेधले होते. प्रलंबित याचिकांवर यथावकाश सुनावणीनंतरच्या निर्णयाला अधिन राहुन निवडणूक प्रक्रिया राबवण्याचे स्पष्ट निर्देशही न्यायालयाने दिले. त्यामुळे एकीकडे राज्यातील ८०७ स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ५९५ संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांचा मार्ग मोकळा झालेला असताना जिल्ह्यातील संगमनेरसह दहा आणि राज्यातील ९२ नगरपालिकांच्या निवडणुकांचा निर्णय मात्र अधांतरितच राहीला आहे. वास्तविक या नगरपालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रमही जाहीर झाला होता, मात्र ऐनवेळी ‘सर्वोच्च’ न्यायालयाने त्याला स्थगिती दिली. त्यावरील मनाई अद्याप तशीच असल्याने ‘स्थानिक’च्या निवडणुकांबाबत ‘सर्वोच्च’ निर्देश मिळाल्यानंतरही या ९२ नगरपालिकांच्या निवडणूका मात्र तांत्रिक कारणाने खोळंबण्याची शक्यता आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बार उडवण्याच्या हंगामातच सर्वोच्च न्यायालयाने डिसेंबर २०२१ मध्ये राज्यातील इतर मागास प्रवर्गाचे (ओबीसी) राजकीय आरक्षण संपुष्टात आणले. त्यामुळे त्यावेळी दृष्टीपथात असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले. राज्याची बाजू मांडण्यात तत्कालीन आघाडी सरकार अपयशी ठरल्याने त्यावेळी ओबीसी आरक्षणाशिवाय जिल्ह्यातील अकोले, पारनेर व कर्जतसह राज्यातील काही नगर पंचायतींच्या (पान ३ वर)

■ विविध नाट्यमय घडामोडींनी रंगलेल्या २०२१-२२ या वर्षात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा हंगाम सुरु होत असतानाच सर्वोच्च न्यायालयाने ‘ओबीसी’ आरक्षण संपूष्टात आणून आरक्षणाशिवाय ‘स्थानिक’ निवडणूका घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार तत्कालीन आघाडी सरकारने महायुती सरकारचा बहुसदस्यीय प्रभागरचना व थेट नगराध्यक्ष निवडीचा निर्णय रद्द करुन राज्यातील मुदत संपलेल्या ९२ नगरपालिकांच्या क्षेत्रात द्विसदस्यीय प्रभागरचनाही निश्चित केली. राज्य निवडणूक आयोगाने न्यायालयाच्या निर्देशानुसार पावसाळ्यानंतर लागलीच ऑगस्ट २०२२ मध्ये निवडणूक कार्यक्रमही जाहीर केला. मात्र त्याचवेळी राज्यात पुन्हा सत्तांतर झाल्याने द्विसदस्यीय व थेट जनतेतून नगराध्यक्षाचा विषय सर्वोच्च दरबारी पोहोचला आणि या प्रक्रियेला ‘ब्रेक’ लागला, जो आजही कायम असून सर्वोच्च निर्णयानंतरही त्यावरील अनिश्चितता कायम आहे.

# बियाणांसोबत शेतकऱ्यांना खतांची व इतर सक्ती नको : ग्राहक पंचायत

**नायक वृत्तसेवा, अकोले**

अदिवासी बहुल अकोले तालुक्यामध्ये मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाने शेतातील पिके मोठ्या प्रमाणात उध्वस्त झाल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. तशातच सर्व सामान्य शेतकऱ्यांना बी-बियाणे व खते खरेदीसाठी पदरमोड करून पैसे उपलब्ध करावे लागत आहेत. त्यामुळे बियाणासोबत शेतकऱ्यांना खताची व इतर सक्ती करू नये असे अकोले ग्राहक पंचायतीने म्हटले आहे.

कृषीच्या काही बोगस कंपन्यांनी बी-बियाणे व खत वाटप चालु केलेले आहे, या वेळी लिंकिंगच्या नावाखाली इतर खते विकत घेण्याची सक्ती होत आहे. त्यातून शेतकऱ्यांचा अतिरिक्त खर्च होऊन त्यांची आर्थिक फसवणूक मोठ्या प्रमाणात होत आहे.

अकोले तालुका ग्राहक पंचायत महाराष्ट्राने जागतिक ग्राहक दिनात तक्रार दाखल केली असता तहसीलदार डॉ. सिध्दार्थ मोरे यांनी दखल घेऊन त्यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. कावीपू/३३/२०२५ अकोले २७ मार्च २०२५ रोजी तालुका कृषी अधिकारी अकोले व कृषी अधिकारी पंचायत समिती यांना दिले. वरील (पान ३ वर)

# अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करा : ना.विखे पाटील

**नायक वृत्तसेवा, शिर्डी**

राहाता तालुक्यातील बाभळेश्वर, राजुरी ममदापूर, तिसगाव वाडी, अस्तगावच्या काही भागांमध्ये चक्रीवादळ सदृश्य पावसाने डाळिंब, आंबा, ऊस व साठवलेला कांदा तसेच घरे, गोठा यांवर झाडे पडून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्यात यावेत, शासन नैसर्गिक संकटात शेतकऱ्यांसह नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. (पान ३ वर)



# पैसे चोरणाऱ्या आंतरराज्य टोळीला अटक!

## राहुरी पोलिसांची कारवाई



**नायक वृत्तसेवा, राहुरी**

बँक, पतसंस्थेसमोर लावलेल्या ग्राहकांच्या मोटार सायकलच्या डिक्कीतून पैसे चोरणाऱ्या आंतरराज्य सराईत टोळीला राहुरी पोलिसांनी छत्रपती संभाजीनगर येथून अटक केली. अटक केलेल्या आरोपींकडून ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सोमनाथ लक्ष्मण धसाळ (रा. वाघाचा आखाडा, (पान ३ वर)

# अठरा जणांची ६६ लाखाची फसवणूक!

## सह्याद्री मल्टीस्टेटच्या १३ जणांवर गुन्हा दाखल




**नायक वृत्तसेवा, अहिल्यानगर**


सह्याद्री मल्टिसिटी निधी लिमिटेड या संस्थेच्या दरेवाडी (ता.नगर) शाखेच्या चेअरमनसह १३ व्यक्तींनी मिळून १८ जणांची ६६ लाख रूपयांची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी प्रमोद राजेंद्र साठे (वय रा. नारायणडोहो) यांनी सोमवारी दुपारी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

दिलेल्या फिर्यादीवरून संस्थेचा चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक, सीईओ, मॅनेजर, पार्सिंग ऑफिसर, कॅशिअर, वित्तीय अधिकारी, कार्यकारी संचालक अशा १३ जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चेअरमन संदीप थोरात, व्हाईस चेअरमन प्रिती सागवान यांच्यासह एकनाथ भालसिंग, दिलीप तात्याभाऊ कोरडे, ईश्वर मचे, संतोष रोकडे, नवनाथ लांगडे, विश्वास पाटोळे, संजय रूपै, पियुष संचेती, सुधाकर शेलार, शारदा फुंदे (पूर्ण नावे माहिती नाही) यांच्याविरुध्द हा गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी साठे यांनी २०२२ सालापासून या संस्थेमध्ये ९ लाख रुपयांची गुंतवणूक केली होती. संस्थेकडून (पान ३ वर)












सुविचार : जागा, उठा आणि धावत राहा जोपर्यंत तुमचे लक्ष्य तुम्ही गाठत नाहीत. – स्वामी विवेकानंद

# पद पाकिस्तानला, धक्का भारताला

आंतरराष्ट्रीय समुदाय सध्या पाकिस्तानवर फारच मेहरबान झाल्याचे दिसत आहे. मागच्या आठवड्यातल्या या संदर्भातल्या दोन बातम्या तर भारतासाठी धक्कादायक ठरल्या आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवाद विरोधी समितीच्या उपाध्यक्षपदावर पाकिस्तानची नियुक्ती करण्यात आली आहे आणि त्याच वेळेस संयुक्त राष्ट्रांच्या तालिबान विरोधातील समितीचे प्रमुखपदही पाकिस्तानला देण्यात आले आहे. या दोन्ही बातम्या भारतासाठी धक्कादायक अशासाठी ठरल्या आहेत की, भारतीय खासदारांची सात शिष्टमंडळे जगभरातल्या विविध देशांमध्ये पाकिस्तान कसा दहशतवादाला आश्रय देतो हे त्यांना पटवून देण्यासाठी तिकडे गेली होती, त्यांचे हे दौरे सुरू असतानाच संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवाद विरोधातील महत्त्वाच्या समितीचे उपाध्यक्षपद पाकिस्तानला दिले गेले आहे. एक वेळ तालिबानच्या विरोधातील समितीचे अध्यक्षपद पाकिस्तानला दिले जाण्याची बाब आपण समजू शकतो. कारण, पाकिस्तान हा तालिबानची राजवट असलेल्या अफगाणिस्तानच्या शेजारचा देश आहे आणि खुद्द पाकिस्तानात अनेक तालिबान गनिमांनी आश्रय घेतलेला आहे. त्यामुळे पाकिस्तानला मिळालेल्या या अध्यक्षपदाविषयी फार आक्षेप घेता येणार नाही; पण संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा समितीने जगभरातल्या दहशतवादाच्या विरोधात जी एक समिती नेमली आहे त्या समितीचे उपाध्यक्षपद पाकिस्तानला दिले जाणे ही बाब मात्र गंभीर आहे. मुद्दाम भारताला खिजवण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाने पाकिस्तानला ही बक्षिसी देऊ केली आहे काय, असा प्रश्न पडल्याशिवाय राहात नाही. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा जगातल्या अनेक देशांनी निषेध केला. हा दहशतवादी हल्ला पाकिस्तान पुरस्कृत होता हे बहुतेक जगाला मान्य असताना दहशतवादाच्या विरोधातील उपाययोजनेची जबाबदारी पाकिस्तानवरच सोपवणे हे कोणत्या गणितात बसते हे समजत नाही. भारत आणि पाकिस्तान यांच्यात अलीकडेच जे संघर्षाचे वातावरण निर्माण झाले आणि प्रत्यक्ष त्यांच्यात चकमक झाली त्यावेळी संपूर्ण जग भारताच्या पाठीशी उभे राहून पाकिस्तानला विरोध करेल अशी अपेक्षा होती, पण येथे मात्र वेगळेच चित्र निर्माण झाले आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाकडून पाकिस्तानवर मेहरबानी करण्याच्या एकामागून एक घटना घडल्या आहेत. पहिल्यांदा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताचा विरोध डावलून पाकिस्तानला आर्थिक मदत दिली, त्यापाठोपाठ जागतिक बँक आणि आशियाई विकास बँक या आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांनीही पाकिस्तानला मदतीचा हात दिला. भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्धसदृश स्थिती निर्माण झाल्यानंतर चीन, तुर्कस्तान, अझरबैझान अशा देशांनी अधिकृतपणे भारताच्या विरोधात पाकिस्तानला पाठिंबा दिला. पाकिस्तानातील नागरिकांना कुवेतमध्ये रोजगारासाठी गेली २० वर्षे व्हिसा दिला जात नव्हता. मात्र, याच कालावधीत कुवेतने ही बंदी उठवून पाकिस्तानी मजुरांना तेथे कामासाठी प्रवेश करण्याची अनुमती दिली. रशियानेही याच काळात पाकिस्तानशी व्यावसायिक करार केले. जगातले हे सगळे देश नेमके याच वेळी पाकिस्तानच्या पाठीशी कसे काय उभे राहिले याचे गूढ निर्माण झाले आहे. दहशतवादाला आश्रय देणारा पाकिस्तान एकेकाळी जगात एकटा पडलेला असताना, आज मात्र साऱ्या जगाला त्याचा कळवळा येत आहे आणि जगात शांतिदूत म्हणून नाव असलेल्या भारताला मात्र आंतरराष्ट्रीय समुदायाकडून मुद्दाम खिजवले जात आहे, हे लक्षण भारतासाठी ठीक नाही. खरं पाहता भारतच आज आंतरराष्ट्रीय पातळीवर एकटा पडला आहे की काय असे चित्र निर्माण होत आहे. ते चित्र संपूर्ण देशासाठी चिंताजनक आहे. या चिंतेची काळजी आता मोदी सरकारने समर्थपणे वाहण्याची गरज आहे. पंतप्रधान मोदी यांनी आजवर जवळपास सर्व जगातील देशांना भेटी देऊन त्या देशांचे भारताशी चांगले संबंध राहतील असे प्रयत्न केले, किंबहुना मोदींमुळे भारताची जगात शान वाढली असे चित्र भारतीय जनता पक्षाने निर्माण केले. पण आज पाकिस्तान विरोधातल्या युद्धात जगातला एकही देश भारताबरोबर नाही विदारक वस्तुस्थिती आपल्या एकूणच परराष्ट्र धोरणाविषयी साशंकता निर्माण करणारी ठरली आहे, हे अपयश नेमके कोणाचे हेही आता निश्चित करण्याची गरज आहे किंबहुना भारताची जागतिक पातळीवर सध्याची पत घसरली आहे ती सुधारण्यासाठी आता आपल्याला परराष्ट्र धोरणाचाही फेरविचार करण्याची वेळ आली आहे. मुळात आंतरराष्ट्रीय समुदायाने पाकिस्तानवर सध्या जी मेहरबानी चालवली आहे ती नेमकी कसली बक्षिसी आहे, असा सवाल भारताने आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर उपस्थित करायला हवा आहे. पंतप्रधान मोदी यांनाही आपल्या एकूणच विदेशी दौऱ्यांबाबत आणि विविध देशांच्या राष्ट्रप्रमुखांशी होणाऱ्या संवादाबाबत आता अधिक सावध राहायला हवे. जगात भारताची पत वाढवणे म्हणजे केवळ वारंवार विदेशांना भेटी देणे आणि तेथील राष्ट्रप्रमुखांची गळाभेट घेणे एवढेच नसते हा मुद्दाही आता लक्षात घ्यावा लागेल. देशांतर्गत कारभारात केंद्र सरकार किती जबाबदारीने वागते, देशात लोकशाही मूल्यांची किती बुज राखली जाते, तसेच देशात अभिव्यक्ती स्वातंत्र्य, प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य याला किती महत्त्व दिले जाते यावरून जग आपल्या देशाची किंमत करत असते. या पातळीवरसुद्धा मोदी सरकारने आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा करून देशाची प्रतिमा कायम टिकवायला हवी आहे.

# कोविड पुन्हा का पसरतोय?

> कोविड–१९ हा सतत बदलत राहणारा विषाणू असल्यामुळे त्याचे नवे उपप्रकार (सब–व्हेरियंटस्) वेळोवेळी उद्भवत असतात. त्यामुळे अनेक वेळा रुग्णसंख्येतील अचानक वाढीचे कारण हे नवीन उपप्रकारच ठरतात. तसेच, हवामान आणि ऋतूंचाही कोविडच्या प्रसारावर ठळक प्रभाव पडतो. २०२० आणि २१ मध्ये जागतिक तज्ज्ञांनी खात्रीशीररित्या सांगितले होते की, आपल्याला कोविडबरोबरच जगायचे आहे. म्हणजेच कोविडचा विषाणू हा सतत आपल्या वातावरणात राहणारच असून त्याचे नवीन उपप्रकार वेळोवेळी समोर येतील. पण २०२० च्या तुलनेत ते कमी घटक असतील. सध्या भारतामध्ये हेच होत आहे. २०२० आणि २०२१ च्या तुलनेत कोविडचा धोका काहीसा कमी असला तरी असला तरी पूर्णपणे संपलेला नाही. विशेषतः उच्च–जोखीम गटांनी अधिक काळजी घेणे आणि संसर्ग टाळणे हेच सुरक्षिततेचे सर्वोत्तम मार्ग आहेत.

■ डॉ. नानासाहेब थोरात, लंडन



जानेवारी २०२२ नंतर जो विषय आपल्या विस्मरणात गेला होता तो या आठवड्यात पुन्हा लोकांच्या ओठी येताना दिसून येतोय. कोविड हा शब्द पुन्हा जगभरातील माध्यमांच्या मथळ्यात आणि सरकार दरबारी चर्चिला जाऊ लागला आहे. याचे कारणही तसेच आहे. एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आग्नेय आशियातील काही देशांमध्ये कोविड–१९ च्या रुग्णसंख्येत पुन्हा वाढ होताना दिसून आली. यावरून हाँगकाँग, सिंगापूर, चीन आणि थायलंडमध्ये नवीन लाट आल्याचे संकेत दिले गेले. सिंगापूरमध्ये तर एका वर्षातील सर्वाधिक वाढ नोंदवली गेली असून, ३ मे रोजी संपलेल्या आठवड्यात तेथे १४,२०० रुग्णांची नोंद झाल्याचे दिसून आले. हा आकडा त्यापूर्वीच्या आठवड्याच्या तुलनेत सुमारे २८ टक्के अधिक होता. याचदरम्यान चीन आणि थायलंडमध्येही रुग्णसंख्येत वाढ होताना दिसून आली.

**चीनमध्ये सर्वोच्च संख्या**

चीनमध्ये गेल्या उन्हाळ्यामधील सर्वोच्च संख्येशी तुलना करता यंदाच्या वर्षी एप्रिल आणि मे महिन्यामध्ये कोविडबाधित रुग्णांची संख्या अत्युच्च पातळीवर पोहोचल्याची नोंद आहे. याचे मुख्य कारण म्हणजे केपी–२ आणि इतर सबव्हेरिएंट्समुळे संसर्ग वाढल्याची शक्यता वर्तवली जात आहे. चीनमध्ये सध्या चाचण्यांची आणि अहवाल देण्याची पद्धत पूर्वीइतकी सक्रिय नसल्याने प्रत्यक्ष आकडे कदाचित जास्त असू शकतात. वृद्ध लोकसंख्या आणि काही भागांतील अद्यापही तुलनेने कमी लसीकरण यामुळे आरोग्य व्यवस्थेवर प्रचंड ताण येत आहे.

**थायलंडमध्ये का तयार झाले संसर्ग क्लस्टर्स?**

थायलंडमध्ये एप्रिलमध्ये पार पडलेल्या सोंगक्रान महोत्सवादरम्यान लोक मोठ्या प्रमाणावर एकत्र आले, प्रवासही वाढला. त्यामुळे अनेक संसर्ग क्लस्टर्स तयार झाले. या काळात लोकांनी मास्क वापरणे आणि सोशल डिस्टन्सिंग याकडे दुर्लक्ष केले. थायलंडच्या आरोग्य मंत्रालयाने नागरिकांना लक्षणे दिसल्यास त्वरित चाचणी करण्याचे, मास्क घालण्याचे आणि गर्दीपासून दूर राहण्याचे आवाहन केले होते; परंतु लोकांनी त्याकडे दुर्लक्ष केले. ही लाट संपूर्ण आग्नेय आशिया आणि कदाचित इतर भागांवरही परिणाम करू शकते, असा इशारा जगातील अनेक तज्ज्ञांनी दिला होता; त्याकडेही गांभीर्याने पाहिले गेले नाही. पुढे हा परिणाम भारतात दिसून यायला लागला.

**कोविडचा विषाणू बदलतोय**

कोविड–१९ हा सतत बदलत राहणारा विषाणू असल्यामुळे त्याचे नवे उपप्रकार (सब–व्हेरियंटस्) वेळोवेळी उद्भवत असतात. त्यामुळे अनेक वेळा रुग्णसंख्येतील अचानक वाढीचे कारण हे नवीन उपप्रकारच ठरतात. तसेच, हवामान आणि ऋतूंचाही कोविडच्या प्रसारावर ठळक प्रभाव पडतो. २०२० आणि २१ मध्ये जागतिक तज्ज्ञांनी खात्रीशीररित्या सांगितले होते की, आपल्याला कोविडबरोबरच जगायचे आहे. म्हणजेच कोविडचा विषाणू हा सतत आपल्या वातावरणात राहणारच असून त्याचे नवीन उपप्रकार वेळोवेळी समोर येतील. पण २०२० च्या तुलनेत ते कमी घटक असतील. सध्या भारतामध्ये हेच होत आहे.

**विषाणू कोविडचा, वर्तणूक फ्ल्यूसारखी**

कोविडचा विषाणू हा फ्लूच्या विषाणूसारखा वतर्णूक करत आहे. म्हणजेच त्याच्यामध्ये ऋतुमानानुसार आणि स्थानिक वातावरणीय परिस्थिनुसार बदल होत असून वेळोवेळी त्याच्या प्रसार वाढताना दिसून येतोय. युरोपियन आणि अमेरिकेसारख्या देशांमध्ये थंडीच्या दिवसात फ्लूच्या आजाराची रुग्णसंख्या वाढते, तर भारतासारख्या आशियाई देशांमध्ये सहसा उन्हाळ्याच्या महिन्यात पावसापूर्वी रुग्णसंख्या वाढलेली दिसते. हाच पॅटर्न कोविड विषाणूच्या प्रसारात पण दिसून येत आहे. भारतात गेल्या वर्षी २०२४ मध्ये देखील याच काळामध्ये कोविड रुग्णसंख्या वाढली होती आणि जून–जुलै मध्ये कमी झाली होती.

**२०२४ मध्येही वाढले होते रुग्ण**

भारतात मार्च ते मे २०२४ मध्ये कोविड रुग्णसंख्येत सातत्यानं वाढ झाली होती. काही राज्यांमध्ये (महाराष्ट्र, दिल्ली, केरळ, तामिळनाडू) आठवड्याचा पॉझिटिव्हिटी रेट ५ टक्क्यांपेक्षा जास्त झाला होता. तेव्हासुद्धा नवीन उपप्रकारांपैकी जेएन १ आणि त्याचे उपप्रकार सक्रिय होते. पुढे जून–जुलैमध्ये हवामानात बदल (मान्सूनची सुरुवात), लसीकरणाची वाढ आणि नैसर्गिक प्रतिकारशक्तीमुळे रुग्णसंख्या पुन्हा घटली होती. ऋतुनुसार बदलाचे निरीक्षण केले तर भारतात उन्हाळा (मार्च–मे) हा २०२० पासून कोविड रुग्णसंख्येच्या वाढीचा कालखंड दिसून येतो. गरम हवामान असूनही लोक घरात बंद राहतात, वातानुकूलित जागेत असतात, ही बाब विषाणूंच्या संक्रमणासाठी अनुकूल ठरते. तसेच शालेय परीक्षा, सुट्ट्यांमुळे घडणारा प्रवास यामुळे संसर्गाची साखळी निर्माण होते.

**दरवर्षी घ्यावी लागणार दक्षता**

पावसाळ्याच्या सुरुवतीनंतर (जून–जुलै) मध्ये हवामानातील आर्द्रता, संसर्गाचे नैसर्गिक चक्र, आणि पूर्वी संक्रमित झालेल्या लोकांची प्रतिकारशक्ती यामुळे संसर्ग कमी होतो. त्यामुळे जर हाच ऋतूवार ट्रेंड पुढेही कायम राहिला, तर भारतात दरवर्षी फेब्रुवारी–मे दरम्यान दक्षता घेणं अत्यावश्यक ठरेल आणि यावरच सरकारी आरोग्यविषयक धोरणात्मक बदल करावे लागतील.

**जागतिक आरोग्य संघटना काय सांगते?**

जागतिक आरोग्य संघटनेच्या २८ मेच्या परिपत्रकानुसार एनबी १.८.१ हा ओमायक्रॉनच्या जेएन.१ या उपप्रकाराचा एक नवीन उपप्रकार तयार झाला असून जो जानेवारी २०२५ मध्ये प्रथम ओळखला गेला होता. जगभरात ४० हून अधिक देशांमध्ये या उपप्रकाराचे प्रसार झाले आहेत. यामध्ये अमेरिका, आयर्लंड, थायलंड, भारत, चीन, ऑस्ट्रेलिया, युरोपियन देश आणि ब्रिटन यांचा समावेश आहे.

**उपप्रकारांचा उच्छाद**

ज्या डेल्टा व्हेरिएंटमुळे मार्च २०२१ ते जुलै २०२१ मध्ये भारतात कोविडची दुसरी लाट आली होती त्याच्या तुलनेत सध्या दिसत असलेले अनेक नवे उपप्रकार ह्न उदा. ओमिक्रॉन आणि त्याचे बीए.२, एक्सबीबी, जेएन.१, केपी.२ ह्न हे उपप्रकार साधारणतः सौम्य लक्षणे देणारे आणि अधिक सहजपणे पसरणारे असल्याचे आढळले आहे. जरी याची सौम्य लक्षणे असली तरी हे उपप्रकार जलद पसरत असल्याने एकाच वेळी अनेक लोक बाधित होतात, ज्यामुळे आरोग्य व्यवस्थेवर ताण येऊ शकतो. उच्च–जोखीम गटांमध्ये (वृद्ध, आजारी, लसीकरण न झालेले, मधुमेही रुग्ण) या सौम्य उपप्रकारांचाही परिणाम गंभीर ठरू शकतो. त्याचबरोबर काही उपप्रकार जसे की केपी.२ हे पूर्वीच्या लाटांमध्ये तयार झालेल्या प्रतिकारशक्तीविरुद्ध लढण्याची क्षमता वाढवत आहेत.

सध्या दिसत असलेला कोव्हिडचा प्रसार हा सौम्य ह्न सर्दी, घसा खवखव, थकवा, क्वचित ताप इथपर्यंतच दिसून येत आहे. असे असूनही भारतात सध्या पाच हजारांपेक्षा अधिक रुग्ण असून सुमारे २५ जणांचा मृत्यू झालां आहे. अलीकडेच एका दिवसात सातजण कोविडमुळे मृत्युमुखी पडलेत. विशेषतः केरळ, दिल्ली, महाराष्ट्र, गुजरात, पश्चिम बंगाल, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि राजस्थान या राज्यांमध्ये सर्वाधिक रुग्ण आहेत. केरळमध्ये सर्वाधिक १,४१६ सक्रिय रुग्णांची नोंद झाली आहे, त्यानंतर महाराष्ट्रात ४९४ आणि गुजरातमध्ये ३९७ सक्रिय रुग्ण आहेत. कर्नाटकमध्ये २४ तासांत १२५ नवीन कोविड–१९ रुग्णांची नोंद

## नोंद

झाली आहे. यामुळे राज्यातील सक्रिय रुग्णांची संख्या ४३६ वर पोहोचली आहे.

**एका उपप्रकारात सहा म्युटेशन्स!**

या वाढीमागे एनबी.१.८.१ आणि एलएफ.७ या नवीन उपप्रकारांचा वेगाने होणार प्रसार कारणीभूत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. एनबी.१.८.१ उपप्रकारात ६ नवीन म्युटेशन्स आढळून आली असून, ज्यामुळे हा विषाणू एसीई रिसेप्टरला अधिक सहजपणे चिकटतो आणि शरीरातील प्रतिकारशक्तीला चकवा देतो.

**एसीई म्हणजे काय?**

एसीई २ (अँजिओटेन्सिन कनव्हर्टिंग एंझाईम २) हे एक महत्त्वाचे प्रथिन असून ते मानवी शरीरातील विविध पेशींच्या पृष्ठभागावर आढळते. हे प्रथिन अँजिओटेन्सिनोजेन या मोठ्या प्रथिनाचे लहान प्रथिनांमध्ये रूपांतर करते. यामुळे पेशींच्या कार्यांवर परिणाम होतो. कोव्हिडचा विषाणूच्यावरती असणाऱ्या स्पाइक प्रथिनाचा वापर करून, हा विषाणू एसीई २ शी बांधला जातो आणि पेशींमध्ये प्रवेश करतो व यामुळे संसर्ग होतो. एसीई हा जैवरासायनिक मार्गातील एक महत्त्वपूर्ण घटक आहे. तो रक्तदाब, जखमा भरणे आणि जळजळ यासारख्या शारीरिक प्रक्रियांचे नियमन करण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावतो. हीच प्रथिने शरीरातील रक्तदाब नियंत्रित करण्यास, जखमा भरून येण्यास, शरीरतील दाह कमी करण्यास मदत करतात. त्याचबरोबर हा रिसेप्टर श्वसन नलिकेत आणि फुफ्फुसांमध्ये असतो, जिथे ऑक्सिजन आणि कार्बन डायऑक्साइडची देवाणघेवाण होते. सध्याचा विषाणू या रिसेप्टरवर परिणाम करत असल्यामुळेच श्वास घेण्यास त्रास होऊन रुग्णांच्या शरीरातील ऑक्सिजनची पातळी कमी होत आहे.

**पुन्हा तीच चूक नको:**

मागील कोव्हिडच्या लाटेत आरोग्य यंत्रणेकडून सर्वांत मोठी चूक (यामध्ये खाजगी रुग्णालयांचा खूप मोठा वाटा होता )झाली होती ती म्हणजे कोव्हीड रुग्णांना चुकीचे औषध देणे. यामध्ये रेमडेसिवीरचा वापर खूप प्रमाणात झाला होता. जागतिक आरोग्य संघटनेने अनेक वेळा सांगितले की, कोविड–१९ रुग्णांचा आजार कितीही गंभीर असला तरी त्यांच्यावर रेमडेसिवीर या अँटी–व्हायरल औषधाचा वापर करू नये. कारण त्याचा रुग्णांच्या जगण्याच्या शक्यतांवर कोणताही महत्त्वाचा परिणाम होत नाही. उलटपक्षी रेमडेसिवीर हे यकृत आणि मूत्रपिंडाच्या कार्यावर परिणाम करते. त्यामुळे अचानक रुग्णांचा मृत्यू होऊ शकतो.

गेल्या पाच वर्षांत कोविड विषाणूने विविध लाटांमधून ज्या व्यक्तींमध्ये अधिक धोका आढळला, त्यामध्ये वयोवृद्ध व्यक्ती (६० वर्षांपेक्षा अधिक वयाचे), सहव्याधी असलेले रुग्ण म्हणजेच मधुमेह, उच्च रक्तदाब, किडनीचे आजार असणारे रुग्ण, हृदयविकारग्रस्त, लठ्ठ लोक, स्टिरॉईड्सवर असलेले, कॅन्सरच्या थेरपी घेणारे रुग्ण, अंग प्रत्यारोपण झालेल्या व्यक्ती, तसेच ज्यांची प्रतिकारशक्ती खूपच कमी आहे हे लोक विशेष संवेदनशील ठरले आहेत. यावेळीही त्यांनी काळजी घेण्याची गरज आहे.

सध्या कोविडच्या रुग्णसंख्येत वाढ होत असल्याच्या बातम्या येत असल्या, तरी सर्वसामान्य लोकांनी घाबरण्याची गरज नाही. याऐवजी जास्त जोखीम असलेल्या व्यक्तींची (उच्च–धोका गट) विशेष काळजी घ्यायला हवी. वयोवृद्ध, सहव्याधी असलेले, लहान मुले, प्रतिकारशक्ती कमी असलेल्यांनी विशेष काळजी घ्यावी. २०२० आणि २०२१ च्या तुलनेत कोविडचा धोका काहीसा कमी असला तरी असला तरी पूर्णपणे संपलेला नाही. विशेषतः उच्च–जोखीम गटांनी अधिक काळजी घेणे आणि संसर्ग टाळणे हेच सुरक्षिततेचे सर्वोत्तम मार्ग आहेत.

## दखल

# चेंगरले व्यवस्थापन, भोवला हलगर्जीपणा

**बंगळुरुच्या चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर घडलेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेने रॉयल चॅलेंजर्सच्या संघाचा ऐतिहासिक विजय काळवंडला गेला. गर्दीत व्यक्तींची वैयक्तिक बुद्धी आणि निर्णयशक्ती मंदावते. त्याऐवजी समूहभावना निर्माण होते, जिच्यावर तात्काळ प्रतिक्रिया, अफवा आणि भावनाविवशता सहजगत्या प्रभाव टाकते. त्यामुळेच एखादी अफवा (जसे की गेटवर मोफत प्रवेश आहे) संपूर्ण नियंत्रण मोडून टाकू शकते. आजवरच्या अनेक दुर्घटनांनी हे दाखवून दिले आहे. भविष्यात असे प्रकार घडू द्यायचे नसतील तर लोकप्रबोधनाबरोबरच राज्य शासनांनी पब्लिक इव्हेंट मॅनेजमेंट गाईडलाईन्स तयार करणे आवश्यक आहे.**

क्रिकेटचा जगातील सर्वात मोठा वार्षिक मेळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल)च्या १८ व्या पर्वाची नुकतीच सांगता झाली. यंदाच्या स्पर्धेमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने अखेरचा सामना जिंकत आपले पहिले आयपीएल विजेतेपद पटकावले. हा विजय आयपीएलमधून निवृत्त होत असलेल्या विराट कोहलीसाठी अनन्यसाधारण महत्त्वाचा ठरला. जणू त्याला भावनिक निरोप देणारी ही एक अनमोल भेट ठरली. मात्र, त्याच वेळी या विजयाच्या आनंदावर विरजण टाकणारी एक भयावह घटना घडली. चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या गर्दीत चेंगराचेंगरी होऊन अकरा लोकांना आपला जीव गमवावा लागला. या घटनेने पुन्हा एकदा आपल्या देशातील अपुऱ्या आणि बेशिस्त गर्दी नियंत्रण व्यवस्थेतील गंभीर उणीवा समोर आल्या आहेत. त्याचबरोबर गर्दीमध्ये शिरल्यांतर विवेकाचे भान हरपत जाणाऱ्या लोकमानसिकतेचे दर्शनही यानिमित्ताने पुन्हा एकदा घडले आहे.

जगभरामध्ये फुटबॉलपटूंना जशी लोकप्रियता लाभते किंवा स्टारडम मिळते, तसाच प्रकार भारतात क्रिकेटपटूंबाबत दिसून येतो. त्याचप्रमाणे सिनेसृष्टीतील आघाडीच्या तारे–तारकांनाही अशाच प्रकारची लोकप्रियता लाभते. साहजिकच, या सेलीब्रेटींना पाहण्यासाठी त्यांचे 'डाय हार्ट फॅन्स' म्हणजेच चाहते हे कमालीचे उतावळे झालेले असतात. सध्याच्या सोशल मीडियाच्या काळात अशा सेलीब्रेटींना मोबाईल कॅमेऱ्यात कैद करण्यासाठी, त्यांच्यासोबत सेल्फी काढण्यासाठी किंवा ते उपस्थित असलेल्या ठिकाणची गर्दी टिपण्यासाठी चाहत्यांमध्ये अक्षरशः आसुसलेपण दिसून येते.

बंगळुरुमधील दुर्घटना घडण्याच्या आधी पुण्यातील एका मॉलमध्ये अभिनेता अक्षयकुमारच्या 'हाऊसफुल५'च्या प्रमोशनचे आयोजन करण्यात आले होते. मॉलच्या सर्व मजल्यांवर आणि गॅलऱ्यांमध्ये लोकांनी या चित्रपटातील कलाकारांना बघण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती. यामुळे चेंगराचेंगरीसारखी स्थिती निर्माण झाली. महिलांचा आणि लहान मुलांचा रडण्याचा आवाज ऐकू येऊ लागला. या प्रसंगाचे गांभीर्य ओळखत अक्षय कुमारने तात्काळ माईकवरून हात जोडून सर्व लोकांना शांत राहण्याचे आणि ढकलाढकली टाळण्याचे आवाहन केले. एक लहान मुलीची तिच्या आई–बाबांपासून चुकामुक झाल्याचे लक्षात आल्यानंतर जॅकलीन फर्नांडिस आणि सोनम बाजवा यांनी त्या मुलीला शांत केले आणि तिच्या पालकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. या घटनेचा सोशल मीडियावर व्हायरल होणारा व्हिडिओ पाहिला असता सेलीब्रेटींच्या प्रेमापोटी माणसे कशी वेडी होताहेत आणि भान हरपत आहेत, हे लक्षात येते. मागील काळात 'पुष्पा २'च्या प्रीमियरच्या वेळीही असाच प्रकार घडला होता. त्यावेळी झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये एका महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती.

बंगळुरुमधील गर्दीचे मुख्य आकर्षण होते टीम इंडियाचा तडाखेबंद फलंदाज विराट कोहली आणि त्याची पत्नी सिनेअभिनेत्री अनुष्का शर्मा. या जोडगोळीला पाहण्यासाठी आणि रॉयल चॅलेंजर्सच्या या ऐतिहासिक विजयाचे सेलीब्रेशन करण्यासाठी समर्थकांची, बघ्यांची, चाहत्यांची प्रचंड गर्दी स्टेडियमबाहेर जमली होती. सुरुवातीला अंदाजे एक लाख लोक या विजयाच्या जल्लोषात सहभागी होण्यासाठी जमले होते. पण नंतर उत्साह इतका वाढला की दोन लाखांहून अधिक लोक स्टेडियम परिसरात एकत्र जमले. अशा वेळी तेथील व्यवस्थापन करणाऱ्या यंत्रणेची जबाबदारी शतपटींनी वाढते; परंतु नियोजनाचा अभाव, अपुरी सुरक्षा व्यवस्था आणि अफवा यामुळे परिस्थिती अलगदरित्या हाताबाहेर गेली. गेट क्रमांक ७ जवळ मोफत पास वाटप होत असल्याची अफवा पसरली, आणि त्या दिशेने हजारोंचा लोंढा एकाच वेळी धावू लागला. यामुळे स्टेडियमबाहेर अफरातफरी माजली. वास्तविकता अशी होती की, गेट जवळ कोणतेही अधिकृत पास वाटप नव्हते; पण अफवांची ताकद आणि व्यवस्थेतील तुटवडा यामुळे काही क्षणांतच परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली. स्टेडियमकडे जाणारा रस्ता संकुचित होता आणि एवढ्या मोठ्या गर्दीचा अंदाज आयोजकांना नव्हता. कोणत्याही प्रकारचे रस्ते–वळण नियंत्रण, जमाव व्यवस्थापनासाठी पोलिसांची पुरेशी संख्या, नोंदणीकृत प्रवेश यंत्रणा किंवा तात्काळ आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा या कोणत्याच बाबींचा पुरेसा विचार करण्यात आलेला नव्हता. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनीही गर्दीचा योग्य अंदाज प्रशासनाला लावता आला नाही, हे स्वीकारले आहे. स्टेडियमची क्षमता सुमारे ३५,००० असून प्रत्यक्षात २ ते ३ लाख लोक कार्यक्रमस्थळी आले असतील तर अशा प्रकारची दुर्घटना घडण्याचा धोका वाढतो, हे आज सामान्य माणूसही सांगू शकेल. मग सरकारने हा कार्यक्रम स्थगित केला नाही? किंवा मोठ्या प्रमाणावर पोलिस बंदोबस्त आणि नियोजन का करण्यात आले नाही? लाखो लोकांच्या जिवाशी खेळण्याइतकी निष्काळजी वृत्ती प्रशासन दाखवत असेल तर अशा दुर्घटना अपरिहार्य होतात.

मुळात बंगळुरुमध्ये घडलेली दुर्घटना हे चेंगराचेंगरीचे पहिले प्रकरण नाही. उलट गेल्या पाच वर्षांमध्ये सातत्याने अशा घटना घडत आहेत. उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे पार पडलेल्या महाकुंभानंतर रेल्वेस्थानकावर झालेली चेंगराचेंगरी असो किंवा याच उत्तर प्रदेशातील एका तथाकथित बाबाच्या अध्यात्मिक सत्संगादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये झालेला भक्तांचा मृत्यू असो किंवा अगदी काही आठवड्यांपूर्वी गोव्यामध्ये झालेली चेंगराचेंगरी असो; या सर्वांच्या मुळाशी समान कारणे असतात. एक म्हणजे अशा कार्यक्रमांचे आयोजन करणाऱ्यांचा बेफिकिरपणा, दुसरे म्हणजे गर्दीनियंत्रणाची जबाबदारी असणाऱ्या यंत्रणांचा किंवा व्यवस्थापनाचा हलगर्जीपणा आणि तिसरे म्हणजे प्रशासनाचे किंवा पोलिसांचे सर्व आदेश पायदळी तुडवून वेडेपिसे होऊन जल्लोष करणारे किंवा तारतम्य हरपून बसलेले नागरीक. दुर्दैवाची बाब म्हणजे असंख्य दुर्घटना घडूनही या तिन्ही घटकांमध्ये तसूभरही फरक पडत नाही. दरवेळी अशा चेंगराचेंगरीनंतर व्यवस्थेला, शासनाला, प्रशासनाला, पोलिसांना दोष देऊन त्यांच्याकडे चार बोटे करताना अशा कार्यक्रमांना जाणाऱ्या नागरिकांनीही सुजाणपणाचे दर्शन घडवणे अपेक्षित आणि आवश्यकच असते. बंगळुरुच्या दुर्घटनेमध्ये पोलिसांकडून गर्दीला पांगवण्यासाठी आवाहन केले जात होते; पण आपल्या लाडक्या क्रिकेटपटूंना पाहण्याच्या वेडापायी आतूर झालेले चाहते त्या आवाहनाकडे ढुंकूनही पाहण्यास तयार नव्हते. ही स्थिती सर्वदूर दिसून येते. याचे कारण गर्दीत व्यक्तींची वैयक्तिक बुद्धी आणि निर्णयशक्ती मंदावते. त्याऐवजी समूहभावना निर्माण होते, जिच्यावर तात्काळ प्रतिक्रिया, अफवा आणि भावनाविवशता सहजगत्या प्रभाव टाकते. त्यामुळेच एखादी अफवा (जसे की गेटवर मोफत प्रवेश आहे) संपूर्ण नियंत्रण मोडून टाकू शकते. हे लक्षात घेता आयोजक आणि प्रशासनाने दक्ष राहणे गरजेचे असते. सततच्या या घटना रोखण्यासाठी लोकप्रबोधनाबरोबरच राज्य शासनांनी पब्लिक इव्हेंट मॅनेजमेंट गाईडलाईन्स तयार करणे आवश्यक आहे. तामिळनाडूमध्ये २०११ नंतर अशा मार्गदर्शक तत्त्वांचे नियम बनवण्यात आले आहेत. पण अशा दुर्घटना भविष्यात घडू नयेत यासाठी स्वतंत्र गर्दी व्यवस्थापन युनिट प्रत्येक जिल्ह्यात स्थापन करणे, सर्व सार्वजनिक कार्यक्रमांना पूर्व परवानगी आणि 'रिस्क ऑडिट' सक्तीची करणे, प्रशिक्षित स्वयंसेवक दल तयार करणे (एनसीसी, स्काऊटचा उपयोग), गर्दीची सूचना देणारे मोबाइल ॲप तयार करणे, प्रत्येक मोठी स्टेडियम, मंदिर, रेल्वे स्थानकात नियमित इमर्जन्सी ड्रील करणे यांसारख्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. सार्वजनिक सुरक्षेचा पाया हा व्यवस्थापनात आहे. या व्यवस्थापनामध्ये समाजशास्त्र, मानसशास्त्र, तंत्रज्ञान, प्रशासन आणि कायदा या सर्वांचा समन्वय आवश्यक असतो. प्रत्येक घटना, अपघात किंवा शोकांतिका हे आपल्याला हेच शिकवत असतात. पण आपण त्यातून बोधच घेत नाही !

– प्रा. विजया पंडित

पाहिजेत

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४



बांधिलकी जनहिताची
नायक
MAHMAR/2018/75654 | SRP/135/2022-2024



जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे (एम.एस.-शल्य) कन्सल्टंट जनरल अँण्ड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे (बी.ए.एम.एस.) स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन
सर्जरी
लेझर सेंटर
स्त्रीरोग-प्रसुति
मुळव्याध-भगंदर-फिशर









# घुलेवाडी ग्रामीण रुग्णालय अंधारात!

## रुग्णांची सुरक्षितता धोक्यात; वरिष्ठांचे दुर्लक्ष

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**




संगमनेरकरांच्या आरोग्याच्या दृष्टीने अस्तित्वास आलेले घुलेवाडी येथील ग्रामीण रुग्णालय रात्रीच्या अंधारात गडप होत आहे. त्यामुळे येथे रात्री-अपरात्री ऐनवेळी उपचारासाठी जाणाऱ्या रुग्णांची सुरक्षितता धोक्यात आली असताना वरिष्ठांचे मात्र याकडे सोयीस्कर दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

संगमनेर (घुलेवाडी) येथील ग्रामीण रुग्णालय हे संगमनेर तालुक्यातील एक महत्व-ाचे शासकीय रुग्णालय आहे. येथे प्राथमिक आरोग्य सेवा, प्रसूतिगृह, लसीकरण, तपासणी व आपत्कालीन सेवा पुरवल्या जातात. जिल्हा आरोग्य यंत्रणे अंतर्गत हे रुग्णालय कार्यरत असून सर्वसामान्यांसाठी ते उपयुक्त आहे. मात्र रात्री रुग्णालय सोडून रुग्णालयाचा बाहेरचा परिसर अंधारात गडप होत आहे. त्यामुळे रात्री अपरात्री उपचारासाठी जाणाऱ्या रुग्णांची सुरक्षितता धोक्यात आली आहे. रुग्णालय परिसराच्या बाजूचे विजेचे दिवे बंद असल्याने आणि त्यातच रुग्णालय परिसरात झाडे असल्याने गडद अंधार या परिसरात असतो. त्यामुळे एखादी अनुचित घटना घडण्याची ही शक्यता नाकारता येत नाही. रुग्णालयाच्या इंट्री गेट पासून रुग्णालय इमारत सोडली तर सर्वच ठिकाणी रात्रीचा गडद अंधार असतो. त्यामुळे आपत्कालीन काळी उपचारासाठी जाणारा रुग्ण आणि त्याचे नातेवाईक अंधारात चाचपडत कसेबसे रुग्णालयापर्यंत पोहोचतात. रुग्णालय परिसरात असणारे दिवे नादुरुस्त आहेत की? विजेचे दिवे सुरू करण्याचा रुग्णालय प्रशासनाला कंटाळा येतो की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे रुग्णालय प्रशासनाने रात्रीच्या वेळी रुग्णालय परिसरातील विजेचे दिवे कसे सुरु राहतील यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

# संगमनेरात लाल चिखल!

## दर कोसळल्याने टोमॅटो रस्त्यावर

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



मार्च-एप्रिलमध्ये तीव्र उन्हाळा व मे महिन्यात सलग १५ दिवस पडलेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तालुक्यातील बागायती फळभाज्यांनाही त्याचा फटका बसला. परिणामी भाजीपाल्याची गुणवत्ता ढासळल्याने दर कोसळले आहेत. जास्त फटका टोमॅटोला बसला आहे. अतिपावसाने टोमॅटोचा रंग बदलल्याने बाजारात दर कोसळले. त्यामुळे टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना शेतातील टोमॅटो रस्त्यावर फेकून द्यावे लागत आहेत.

तीन महिन्यात शेतकऱ्यांना लाखो रुपये मिळवून देणारा टोमॅटो आता शेतकऱ्यांच्या डोळ्यात पाणी आणत आहे. किलोला १८० ते २०० रुपयांप्रमाणे असलेल्या टोमॅटोच्या दराला आता कवडीमोल भाव आला आहे. किरकोळ बाजारात टोमॅटोला १० ते १५ रुपये किलो असा दर मिळत आहे. होलसेल मध्ये पाच ते आठ रुपयांपर्यंत दर मिळत आहे. गेल्या वर्षी या दिवसात सरासरी १२०० ते २००० रुपये प्रतिक्रेट दराने टोमॅटो विकला गेला होता. यावर्षी टॉमेटो १०० ते ३०० रुपये प्रतिक्रेटवर आला आहे. त्यामुळे टोमॅटो उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात आला आहे. यामुळे दर नसल्याने शेतकऱ्यांनी टोमॅटो रस्त्यावर फेकून डोक्याला हात मारून घेतला आहे.

नायक ANCHOR

# विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने वसुंधरा अकॅडेमी फुलले



**नायक वृत्तसेवा, अकोले**

> ■ प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांचे स्वागत केले व त्यांना शुभेच्छा दिल्या. त्यांच्या हस्ते शाळेत आलेल्या नवीन विद्यार्थी व शिक्षकांचे स्वागत करण्यात आले. इयत्ता पहिलीच्या छोट्या चिमुकल्यांच्या हातून केक कापून शाळेच्या पहिल्या दिवसाचे उत्साहाने स्वागत झाले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.

डोळ्यात कुतुहल, मनात हुरहूर, शाळेत जाण्याचा आनंद, नवीन वर्गाची उत्सुकता, मित्र-मैत्रिणींना, शिक्षकांना भेटण्याची ओढचेहऱ्यावर असे एक ना अनेक संमिश्र भाव, नवीन स्कूल ड्रेस, पाठीवर स्कूल बॅग, हातात टिफीन बॅग, वॉटर बॉटल अशा थाटात विद्यार्थ्यांनी शाळेच्या पहिल्या दिवशी गेटमधून प्रवेश केला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने शाळाचा परिसर दुमदुमून गेला होता.

अभिनव शिक्षण संस्थेचे वसुंधरा अकॅडमी व अभिनव प्री स्कूल या शाळा सोमवारी सुरू झाल्या. नवीन ड्रेसचा हवाहवासा वाटणारा सुगंध, नव्या वह्या, नवीन पुस्तके विद्यार्थ्यांच्या आनंदात भर घालत होते. उन्हाळ्याची मोठी सुट्टी संपवून विद्यार्थ्यांची शाळा सुरू झाली. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी रंगीबेरंगी फुले, झाडे, फुगे, कार्टून कट आउट्स, कार्टून कॅरेक्टर्स, रांगोळी अशा विविध प्रकारे वसुंधरा अकॅडमीचा कॅम्पस जणू सज्ज झाला होता. प्रत्येक विद्यार्थी मोठ्या उत्साहाने आनंदाने शाळेच्या गेटमधून आत प्रवेश करत होता. शाळेचे प्राचार्य व शिक्षक त्यांचे औक्षण करून स्वागत करत होते. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना शाळेत सोडवायला आलेल्या पालकांच्या मनातही हुरहुर होती. आपला पाल्य वसुंधरा अकॅडमीत शिक्षण घेत आहे असा अभिमान होता. मोठ्या उत्साहात शाळेच्या पहिल्याच दिवशी सकाळच्या असेम्ब्ली मध्ये सर्व विद्यार्थी सहभागी झाले. जणू काही शाळा सुरू होण्याची सर्वजण खूप आतुरतेने वाट पाहत होते आणि तो दिवस उगवला. शाळेच्या गीतमंचाने एक सूर, एक लय, एक ताल धरत राष्ट्रगीत, राज्यगीत, व सकाळची प्रार्थना सादर केली. ब्लू हाऊसच्या विद्यार्थ्यांनी परिपाठ सादर केला. असेंबली नंतर शाळेचे संगीत शिक्षक इंद्रभान कोल्हाळ यांनी आपल्या सुमधुर आवाजात सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करत स्वागत गीत सादर केले. शाळेच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, ज्येष्ठ शिक्षक प्राजक्ता सोलापुरे, वृषाली शेटे, सुनील खताळ व उपस्थित पालक यांनी सरस्वती पूजन करून विद्येची ज्योत प्रज्वलित केली. विद्यार्थ्यांनी आपल्या नृत्याद्वारे सर्वांना आम्ही शाळेत आलोय असे म्हणत आनंद व्यक्त केला. पहिल्याच दिवशी शाळेतील विविध ॲक्टिव्हिटी मध्ये विद्यार्थी रममाण झाले. संस्थेचे अध्यक्ष मधुकर नवले यांनी सर्व विद्यार्थ्यांना व पालकांना शुभेच्छा दिल्या. अशा प्रकारे शाळेचा पहिला दिवस मोठ्या उत्साहात झाला. शाळेचा पहिला दिवस आनंददायी व संस्मरणीय करण्यासाठी वसुंधरा अकॅडमीच्या सर्व शिक्षकांनी मेहनत घेतली. सुमैय्या शेख व रक्षा पांडे यांनी स्वागत समारंभाचे संचालन केले. प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनीच हा दिवस मोठ्या आनंदात साजरा केला.

# स्कायलाईट रुग्णांच्या सेवेत दाखल!

## अनेक मान्यवरांनी दिल्या शुभेच्छा

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**




> ■ शहरातील देवाचा मळा परिसरातील बालाजी अपार्टमेंट जवळ नवीन जागेत स्कायलाईट हॉस्पिटलची उभारणी करण्यात आली आहे. ३५ बेड सह अद्यावत सुविधा या ठिकाणी मिळणार आहेत. विविध आजारांची तपासणी व उपचार या रुग्णालयात केले जाणार आहेत. एकाच छताखाली स्कायलाईट मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल मधून एवढ्या सर्व सुविधा मिळणार असल्याने रुग्णांची गैरसोय टळणार आहे.

रुग्णांची गरज ओळखून येथील डॉ. विशाल मुटकुळे, डॉ. संतोष पोखरकर आणि सतीश घुले या वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या मित्रांनी एकत्र येत स्कायलाईट मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलची निर्मिती केली आहे. या हॉस्पिटलच्या माध्यमातून एकाच छताखाली रुग्णांना सुलभ सेवा मिळणार आहे. रविवारी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत या रुग्णालयाचे उत्साहात लोकार्पण करण्यात आले.

गेल्या अनेक वर्षापासून रुग्णांना आरोग्य सेवा देत असलेले डॉ. विशाल मुटकुळे, डॉ.संतोष पोखरकर, सतीश घुले या तिघाही मित्रांनी एकत्र येत रुग्णांना अद्यावत सेवा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शहरात स्कायलाईट हॉस्पिटलची उभारणी केली आहे. रुग्णांची हेळसांड आणि त्यांच्या नातेवाईकांची होणारी धावपळ थांबवण्यासाठी एकाच छताखाली रुग्णांना आरोग्य सेवा मिळाव्यात ही या मागची मूळ कल्पना आहे. यासाठी या हॉस्पिटलच्या माध्यमातून प्रयत्न होणार आहेत. रविवारी या हॉस्पिटलचा लोकार्पण सोहळा पार पाडला. यावेळी शुभेच्छा देण्यासाठी आमदार अमोल खताळ, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार वैभव पिचड, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी विखे, कांचन थोरात, थोरात कारखान्याचे उपाध्यक्ष पांडूरंग घुले, अजय फटांगरे, चंद्रकांत घुले, भाजपाच्या शहराध्यक्षा पायल ताजणे, घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयाचे डॉ.राजकुमार जराड, डॉ. संदीप कचेरीया, शशी माघाडे, विलास वर्पे, कैलास वाकचौरे, सुनील कडलग आदींसह अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावत शुभेच्छा दिल्या. यावेळी डॉ. सोमनाथ मुटकुळे,डॉ. किशोर पोखरकर, डॉ. विशाल मुटकुळे, डॉ. शिवानी मुटकुळे, डॉ. संतोष पोखरकर, डॉ. प्राजक्ता पोखरकर, डॉ. स्मित घुले, सतीश घुले, राजेंद्र नवले, दीप्ती घुले, शिवनाथ कुडेकर यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व आभार मानले.








कुटे हॉस्पिटल अॅण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
● मॉड्युलर ऑपरेशन थिएटर ● एसी/डिलक्स रुम्स् ● महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध ● तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ ● डायलेसिस विभाग ● इन्टरकॉम, टीव्ही ● ९ बेडस्चा सुसज्ज आय.सी.यु. विभाग व सुसज्ज अपघात विभाग ● नर्स कॉल बेल सिस्टिम ● गरम पाण्यासाठी सोलर ● सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन ● सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया ● सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध ● अत्याधुनिक सुविधा ● ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५